E-ISSN: 3049-1541
KNOWLEDGE FLAME
INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (KF-IMRJ)
(An International Indexed & Peer Reviewed Journal)
https://knowledgeflame.in PRGI Reg. No. MAHMUL/2024/89852

# म.बसवेश्वर आणि संत नामदेव : बंध-अनुबंध

डॉ. लक्ष्मण गादगे
मत्स्योदरी महाविद्यालय अंबड

भारतीय समाज मध्ययुगीन कालखंडात धार्मिकदृष्ट्या वैदिक धर्माच्या वर्चस्वाखाली वावरत होता. राजकीय स्थिती सत्ताभिलाषेमुळे अस्थिर बनली होती.सामाजिकदृष्ठ्या व्यवसायाचे रूपांतर जातीत झाल्यामुळे असंख्य जाती निर्माण होऊन समाज छिन्नविछिन्न झाला होता. आर्थिकदृष्ठ्या विषमतेची दरी वाढलेली होती. अशा परिस्थितीत महात्मा बसवण्णांचा जन्म ( इ. स. 1105) विजयपूर जिल्हयातील बागेवाडी येथे झाला.त्यांनी कूडलसंगम येथे अध्ययन केले. मंगळवेढा येथे क्रांती कार्याची सुरूवात केली.

कल्याण म्हणजे आजचे बसवकल्याण येथे त्यांच्या कर्तबगारीला बहर आला. त्यांनी विद्यमान सर्व परिस्थितीचा अभ्यास केला आणि वर्ण, जात, वर्ग, पंथ, लिंग या सर्व भेदांच्या पलिकडे जाऊन अनुभव मंटपाच्या माध्यमातून सर्वांना एकत्रित आणण्याचा प्रयत्न केला.म्हणूनच बसवण्णा हे धार्मिकदृष्ठ्या गुरू म्हणून, तर सामाजिकदृष्टया लोकनायक म्हणून ओळखले गेले. यास समकालीन अनेक शरणांची वचने साक्ष आहेत. महात्मा बसवण्णांच्या नंतर सुमारे दीडशे वर्षांनी संत नामदेवांचा जन्म ( इ. स. 1270) झाला. हिंगोली जिल्हयातील आजचे नरसी नामदेव हे त्यांचे जन्मगाव. बसवकल्याण हे नामदेवांचे आजोळ.त्यांच्या बालपणीच सर्व कुटूंब पंढरपुरास वास्तव्यास आले. तिथे नामदेवांना सावळ्या विठ्ठलाचा छंद लागला. नामदेव पुंडलिकापाशी ( वाळवंटात ) कीर्तनास उभे राहिले आणि सांगितले, 'नाचू कीर्तनाचे रंगी। ज्ञानदीप लावू जगी॥'.

संत नामदेवांच्या या आश्वासक वाणीने वाळवंटात सारा बहुजन समाज एकत्र आला. तत्कालीन धर्म व्यवस्थेने बहिष्कृत केलेले ज्ञानदेव, निवृत्तीनाथ, सोपानदेव, मुक्ताई, चोखामेळा, गोरा कुंभार, जनाई, कान्होपात्रा, सावता माळी, नरहरी सोनार या संतांची मांदियाळी वाळवंटात जमली. नामदेवांनी या मांदियाळीचे नेतृत्व केले. या संदर्भात सुप्रसिध्द कादंबरीकार भालचंद्र नेमाडे यांनी 'रिंगण' या वार्षिक विशेषांकात नोंदविलेले मत फार महत्वाचे आहे. ते म्हणतात, "गरीब शिंप्याच्या घरी जन्मलेला नामदेव सर्वांचा नेता म्हणून आपल्या काळात एवढे आदराचे स्थान मिळवू शकला याचे कारण म्हणजे, त्यांने निरनिराळ्या जातीजमातीतील कृतिशील माणसांचा मोठा जत्था वारकरी चळवळीच्या झेंड्याखाली एकत्र आणला.

देशभर प्रवास केलेल्या नामदेवांने भक्तीचा हा नवा विचार दक्षिणेतून घेतला असावा, असे समजले जाते. या विचारांचा प्रसार त्यांने उत्तरेत चौदाव्या शतकाच्या सुरूवातीस केला याबद्दल पुरावे उपलब्ध आहेत." वरील विधानातील शेवटची दोन वाक्ये बसवण्णा व नामदेव यांच्यातील नाते सांगत, भारताचे दोन विभाग असलेल्या दक्षिण भारत आणि उत्तर भारत यासही जोडतात.नामदेवांचे आजोळ बसवकल्याण होते, हा संदर्भ नेमाडेंच्या विधानास पुष्टी देणारा ठरतो.

**देशयात्रा / तीर्थाटन :**

महात्मा बसवण्णा आणि संत नामदेव हे जगाच्या कल्याणाची तळमळ असलेले महापुरुष होते. समाजातील दुःख, दारिद्र्य, अज्ञान, अंधश्रध्दा, शोषण पाहून ते कळवळत असत.या दैन्यातून या समाजाला मुक्त करण्यासाठी ते स्थावर न होता जंगम झाले.जंगम होणे म्हणजे देशसंचारी होणे. देश पाहिल्याशिवाय देशाचे स्वास्थ्य कळणार नाही, म्हणून त्यांनी देशाटन केले. देशयात्रेमुळेच त्यांना समाजाचे दुःख कळाले आणि ते निवारणासाठी त्यांना कृतीकार्यक्रम आखता आला.

12 व्या शतकात संपूर्ण भारतात राजसत्ता नांदत होती. अशावेळी बसवण्णांनी प्रजातंत्र निर्माण करण्याचे स्वप्न पाहिले. हे स्वप्न साकार करण्यासाठी बसवण्णांनी अनेकदा देशसंचार केला. सर्वसामान्यांच्या विकासाकडे येणाऱ्या समस्यांचा अभ्यास केला. समाजाचे सूक्ष्म निरीक्षण केले. बसवण्णा आपल्या देशसंचारात प्रजेच्याअडीअडचणीसमजून घेत.जातीयता व अस्पृश्यता यांचे उच्चाटन झाल्याशिवाय राज्याचा विकास होणार नाही,हे ओळखून बसवण्णांनी त्या संदर्भात कृतिकार्यक्रम आखला. स्वतः शूद्रातिशूद्रांच्या वसाहतीत जाऊन ते विचारपूस करीत. त्यांच्या घरी भोजन करीत. सहपंक्तीभोजन घडवून आणत. समाजसुधारणेसाठी त्यांनी स्वतंत्र अशी जंगमव्यवस्था निर्माण केली होती. ते जंगम संचार करीत बसव मूल्यांचे प्रतिपादन करीत असत. कायक, दासोह तत्वामुळे कल्याण राज्यात, ' मागणारे कोणीही नसल्याने, मी गरीब झालो, देवा !'असे उद्‌गार खुद...

बसव स्थापित अनुभव मंटपात कपडे धुणारा धोबी माचीदेव, दोर वळणारा नुलिय चंदय्या, चप्पल शिवणारा चांभार हरळय्या, मातंग चेन्नय्या, डोहर कक्कय्या, कुंभार गुंडय्या, न्हावी अप्पण्णा, नावाडी चौडय्या, गुराखी रामण्णा, बहुरूपी चौडय्या, झाडलोट करणारी सत्यक्का, संकव्वा, लक्कम्मा, अक्कमहादेवी, सिध्दराम, अल्लमप्रभू ही सर्व माणसं एकत्रित आली. त्याचप्रमाणे नामदेवांच्या वाळवंटातील कीर्तनात गोरा कुंभार, चोखामेळा, सावता माळी, सेना न्हावी, नरहरी सोनार, निवृत्तीनाथ, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई, जनाई, कान्होपात्रा यांची मांदियाळी जमली तेव्हा नामदेवांनी सांगितले,

**'कीर्तनाच्या सुखे सुखी होतो देव ।**

**कोणते वैभव वाणी आत्ता ॥**

**अंत्यज आणि जातिवंता । मुखी नाम घेता उडी घाली ॥**

**बैसोनि आसनी आळविता नाम ।**

**उभा सर्वोत्तम तयापुढे ॥**

**प्रेमाचिया भरे उभयाने गर्जत ।**

**नाचे हा अनंत तयासवे ॥**

**नामा म्हणे तया कीर्तनाची गोडी ।**

**घालितसे उडी नेटेपाटे ॥'**

**( अ. क्रं. 1895 )**

अनुभव मंटपातील शरणांनी स्वानुभवाची अभिव्यक्ती वचनातून केली. संतांनी आपले अनुभव अभंगाद्वारे सांगितले. ज्या समाजघटकांना शतकानुशतके गुलामीतच जगावे लागले, त्या समाजाला अभिव्यक्त होण्याचे मिळालेले स्वातंत्र्य फार मोलाचे होते. ही किमया अनुभव मंटप आणि कीर्तनातून साध्य झाली. मध्ययुगीन कालखंडात या दोन परंपरांनी खऱ्या अर्थाने जगी ज्ञानदीप लाविले.सारा बहुजन समाज शहाणा करण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

**वचन आणि अभंग :**

महात्मा बसवण्णा आणि संत नामदेव यांनी अभिव्यक्त होण्यासाठी नवा वाङ्मयप्रकार जन्मास घातला. तो आपल्यापुरता सीमित न ठेवता, सर्वांसाठी मुक्त केला. संस्कृत भाषेची मक्तेदारी मोडीत काढत लोकभाषेचा पुरस्कार केला. ज्ञानाचे लोकशाहीकरण केले. म्हणूनच दोन्ही महापुरुषांच्या समकालीन अपार वाङ्मय निर्माण केले. स्वतः बसवण्णा आणि नामदेव यांनी हजारोंच्या संख्येत वचने आणि अभंग लिहिले. वचने आणि अभंग ही अंतरंग व बहिरंग शुध्द करणारी अमूल्य संपदा आहे. मानवी जीवनमूल्यांची खाण आहेत. ती व्यष्टी आणि समष्टी कल्याणाचा बोध करतात. वचने आणि अभंग भारतीय समाजातील वैगुण्यांवर प्रहार करीत नैतिक आचरणाचा संदेश देतात. बसवण्णांची भाषा थेट हृदयाला भिडणारी, सरळ सोपी आणि स्पष्ट आहे. संत नामदेवांची भाषा थोडीशी सौम्य, पण भेदक आहे.

भारतीय समाजमनावर देव आणि धर्माचा जबरदस्त प्रभाव आहे. या मानसिकतेचा फायदा घेऊन वैदिकांनी धर्म व देवाचा बाजार मांडला. आत्मशुध्दी, मानसिक स्वास्थ्य आणि समाधान हरवत जाऊन देव व धर्म शोषणाचे केंद्र बनले. ही व्यवस्था महात्मा बसवण्णा आणि संत नामदेव हे दोघेही नाकारतात. महात्मा बसवण्णा म्हणतात,

**'सधन बांधिती देवालय, देवा, मी गरीब करू काय?**

**देवळाचे खांब माझे पाय, देहचि माझे देवालय,**

**मस्तक हे सुवर्ण कलश, स्थावर पावे नाश,**

**जंगम हे अविनाश,**

**परिसावे बा कूडलसंगमदेवा ..!'**

संत नामदेव काय म्हणतात पहा-

**देव दाखवी असा नाही गुरू । जेथे जाय तेथे दगड शेंदरू ॥**

**देव दगडाचा बोलेल कैसा ? कोणे काळी त्यास फुटेल वाचा ॥**

**देव देव करिता शिणले माझे मन ।**

**जेथे जाय तेथे पूजा पाषाण ॥**

**नामा तोचि देव हृदयी पाहे । नामा केशवाचे न सोडी पाय ॥**

**(अ. क्र. 1361)**

महात्मा बसवण्णा आणि नामदेव हे दोघेही ' देह देवालय ' असल्याचे सांगतात. तत्कालीन धर्मव्यवस्था ही देवप्राप्तीसाठी यज्ञयाग, व्रत, उपवास, तीर्थयात्रा, बहुदेवोपासना, अरण्यसेवन अशी नानाविध साधने सांगत होती. महात्मा बसवण्णा या सर्व साधनांचा त्याग करून देवाला प्रसन्न करण्याची नवी रीत सांगतात. ते म्हणतात -

**करू नको चोरी,**

**करू नको हत्या,**

**बोलू नको मिथ्या, कदापिही,**

**नको मानू राग,**

**नको तिरस्कार,**

**आत्मस्तुतीपर बोलू नको,**

**अंतरंग - बहिरंग शुध्दी,**

**हीच कूडलसंगमदेवा प्रसन्न करण्याची रीत..!**

ही रीत समाजाचे नैतिक उन्नयन करणारी आहे. संत नामदेव नामस्मरणाचा मार्ग सांगत ह्या नाना साधनांचा खटाटोप नाकारतात. त्यांच्याच भाषेत सांगायचे झाले तर -

**व्रत तप न लगे करणे सर्वथा ।**

**न लगे तुम्हा तीर्था जाणे तया ॥**

**आपुलेची ठायी असा सावधान ।**

**करा हरिकीर्तन सर्वकाळ ॥**

**न लगे ते काही वर्जावे अन्न जीवन ।**

**लावा अनुसंधान हरीचे पायी ॥**

**न लगे योग याग न लगे संगत्याग ।**

**असो द्या अनुराग हरीचे पायी ॥**

**न लगे निरंजन करणे वास तुम्हा ।**

**दृढ धरा प्रेमा हरीचे नामी ॥**

**नामा म्हणे नाम दृढ धरा कंठी ।**

**तेणे देईल भेटी पांडुरंग ॥**

**(अ. क्रं. 1428)**

भौतिक सुख सोयीनी संपन्न होत चाललेला माणूस नैतिकदृष्ट्या दरिद्री होत आहे. कुटूंबातील लोकांविषयीचं प्रेम,दया, सहानुभूती सहकार्य, जिव्हाळा या गोष्टी हरवत चालल्या आहेत. तिथे अतिथीचे स्वागत कोण करणार ? अशा माणसांना सावध करताना बसवण्णा म्हणतात,

**‘या हो, या हो ' म्हणत पुसता क्षेमकुशल,**

**ऐश्वर्य तुमचे उडून जाईल का ?**

**‘या बसा ' म्हंटल्यास तुम्ही,**

**खचून जाईल का ही भूमी ?**

**पाहुनी बोलाल जर सत्वर,**

**फुटेल का तुमचे शीर, उदर ?**

**भले तुम्ही काही देऊ नका,**

**परि नसेल जर सद्भाव**

**नाक कापल्याविन राहील का प्रभू कूडलसंगमदेव ?**

महात्मा बसवण्णांच्या या वचनातील आशय संत नामदेवांच्या एका अभंगात व्यक्त झाला आहे तो असा -

**अतिथी आलिया द्यावे अन्नदान ।**

**अर्पी जीव प्राण परमार्थी ॥**

**तोचि एक नर श्रीहरीसमान ।**

**करी दुजा कोण नाही ऐसा ॥**

**दीनासी सन्मान करीता आदर ।**

**त्याच्या उपकारा पार नाही ॥**

**नामा म्हणे ऐसे असावे भाविका ।**

**सर्वाभूती देखा ऐक्य पाहे ॥**

**(अ. क्र. 1434)**

या शिवाय बसवण्णा आणि नामदेव यांच्या साहित्यात परस्त्री - परधन यांचा तिरस्कार, निंदा स्तुती यातील समत्व, एकदेवोपासना अशा अनेक गोष्टीतील साम्यस्थळे विपुल प्रमाणात सांगता येतात.

**अन्य काही साम्यस्थळे :-**

लिंगायत धर्मात इष्टलिंग दीक्षा देताना गुरू - शिष्यात हस्त - मस्तक संयोग घडवून आणतात. शिष्याच्या अंतरंगातील ज्ञानाची जागृती करण्यासाठीच करस्थळी इष्टलिंग देऊन कानात मंत्रोपदेश केला जातो. नामदेवांच्या एका अभंगातून लिंगायताना अभिप्रेत असलेली परिभाषा अभिव्यक्त होते ती अशी -

**श्रवणी सांगितली मात मस्तकी ठेवियला हात ।**

**पदपिंड विवर्जीत केला नामा ॥**

**खेचरू विसा प्रेमाचा पिसा।**

**तेणे नामा कैसे उपदेशिला ॥**

**तया सांगितले गुज ।**

**आत्ता पाल्हाळी तुज काय चाड ॥**

**मग खेचरू म्हणे मज ज्ञान हेचि गुरू ।**

**तेणे अगोचरू म्हणे केला नामा ॥**

(अ. क्र. 304)

महात्मा बसवण्णा आणि संत नामदेव या दोघांचेही संपूर्ण कुटूंब त्यांच्या आंदोलनात सहभागी होते. त्यातील बहुतेकांनी साहित्य निर्मिती केली आहे. बसवपरिवारातील अक्कनागाई, बसव पत्नी गंगांबिका, नीलांबिका आणि भाचा चन्नबसवण्णा ह्या सर्वांनी वचने लिहिली आहेत. बसवण्णांच्या नंतर कल्याण प्रतिक्रांतीच्या वेळी वचन साहित्याचे रक्षण करण्यात त्यांनी दिलेले योगदान अमूल्य आहे. संत नामदेव व राजाई या दाम्पत्याचे कुटूंब मोठे होते.नारायण, महादेव, गोविंद, विठ्ठल ही चार मुलं आणि लिंबाई ही मुलगी लाडाई, गोडाई, येसाई, साखराई या चार सुना. नामदेव परिवारातील अनेकांनी अभंगरचना केली आहे. बसवण्णा आणि नामदेव आपल्या समकालीन शरण संतांविषयी कमालीचा आदर व्यक्त करतात. बसवण्णांनी अल्लमप्रभू, अक्कमहादेवी, चन्नबसवण्णा, सिध्दाराम यांच्यासह मातंग चेन्नय्या, डोहर कक्कय्या, किन्नरी ब्रम्हय्या यांचा आदराने उल्लेख केला आहे. संत नामदेवांनी समकालीन निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई यांच्या समाधीचे वर्णन आणि गोरा कुंभार, चोखामेळा, जनाबाई, सोयराबाई, निर्मळा, सावता माळी आदी संतांचा माहितीपट अगदी मनोवेधकपणे मांडला आहे. विशेष म्हणजे बसवण्णा मातंग चेन्नय्या, डोहर कक्कय्या यांना वडील, आजोबा म्हणतात, तर संत नामदेव चोखोबांचे वर्णन करताना, ' चोखा माझा जीव चोखा माझा भाव । कुळदेव धर्म चोखा माझा ॥' असे म्हणतात.

महात्मा बसवण्णा हे दक्षिण भारताचे बुध्द म्हणून ओळखले जातात. संत नामदेव 'बौध्द अवतारी आम्ही झालो संत। वर्णावया मात नामा म्हणे ॥ (अ. क्र. 126) असे म्हणतात. हे दोघेही बुध्दाशी नाते सांगतात. बुध्दांच्या क्रांतीचा वारसा बसवण्णा आणि नामदेव यांनी मध्ययुगात जोपासला. त्यांच्यानंतर तुकाराम, फुले, शाहू, आंबेडकर यांनी हा वारसा समृध्द केला. तमोयुगात प्रबोधनाची मशाल पेटती ठेवण्यात बसवण्णा आणि नामदेव यांचे योगदान संस्मरणीय असे आहे.

**संदर्भ :**

१ जुबरे, राजू: 'ज्ञानदीप लावू जगी', महाराष्ट्र बसव परिषद, हिरेमठ संस्थान भालकी बीदर, प्रथमावृत्ती-२०१४

२ परब, सचिन: 'महानामा', मनोविकास प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती-२०१३

३ सरदार,गं, बा.: 'संत वाङ्मयाची सामाजिक फलश्रुती', लोकवाङ्मयगृह प्रकाशन मुंबई, आठवी आवृत्ती-२०१०

४ खोडके, श्री. मा. : 'नामदेवे रचिला पाया', आकांदता प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती -२००८

५ इनामदार, हे. वी.: 'संत नामदेव', केसरी प्रकाशन पुणे, प्रथमावृत्ती-१९७०.